# मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे ''शेततळयातील मत्स्यशेती'' या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



मत्स्य विज्ञान महाविद्यालय उदगीर मार्फत व आत्मा, लातूर पुरस्कृत तीन दिवसीय **''शेततळयातील मत्स्यशेती''** या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दिनांक 27 ते 29 फेब्रुवारी 2024 दरम्यान करण्यात आले आहे. प्रशिक्षणामध्ये शेततळयातील मत्स्यशेती बाबतचे सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. सदरील प्रशिक्षण कार्यक्रम निःशुल्क असून प्रशिक्षणाकरिता मर्यादीत प्रशिक्षणार्थीना प्रवेश देण्यात येईल. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींनी आपला अर्ज (7/12 उतारा सहीत) दि. 20 फेब्रुवारी 2024 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत **मा. सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर जि. लातूर 413517** यांच्याकडे पोहचेल अशा बेताने पाठवावे. अधिक माहितीसाठी मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे डॉ. ए.एस. कुलकर्णी, प्रशिक्षण समन्वयक यांना 9860079826 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. प्रशिक्षणासाठी शेततळीधारकांना प्राधान्य देण्यात येईल तसेच निवड झालेल्या उमेदवारांना त्याच्या संपर्क पत्यावर/भ्रमणध्वनीवर कळविण्यात येईल. तरी इच्छुक शेतकरी तसेच सुशिक्षित बेरोजगार युवकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. आर. खरटमोल यांनी केले आहे.